ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

*डॉ. लता शिवाजी पाटील,

**श्रीमती संगीता बाबासो माने,

* (एम.ए., एम.एड्., एम. फिल., पीएच.डी., सेट) श्री म. ता. ासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर

**(एम.ए., एम.एड्., सेट)

**सारांश:**

*भारतीय शिक्षण पध्दतीत सतत होणारे बदल हे शिक्षण क्षेत्रात मोठी ैक्षणिक क्रांती घडवत आहे. पुर्वीची शिक्षण पध्दती आणि एकविसाव्या ातकातील शिक्षण पध्दती यामध्ये खूप तफावत दिसून येते. आज एकविसाव्या ातकातले पहिले दशक संपताना मात्र आपण शिक्षणाचे मुख्य प्रयोजन ज्ञाननिर्मीती आणि ज्ञानधि ठत समाज घडवण्याच्या अग्रक्रम देणे हे असलूयाचे मानले तर वावगे ठरणार नाही. काळानूसार, समाजानूसार आणि समाजाच्या संस्कृतीनूसार शिक्षणाची उदि टे, अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती यांमध्ये बदल होत असताना दिसून येतो.*

*स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणधोरण १९४९ मध्ये आणले. १९४९ राधाकृ णन आयोग यांनी शिक्षणात तात्काळ प्रगती करण्यासाठी उच्चशिक्षणात बदल करण्यासाठी हा आयोग आणला. पुढे १९५२–५३ मध्ये मुदलीयार आयोग आणला. ज्यांनी दिर्घकाळ प्रगतीवर भर दिला आणि माध्यमिक मध्ये बदल करण्यासाठी हा आयोग आणला गेला. पण या आयोगाने कौशल्य विकासावर भर देण्यास सांगितले.*

*भारतीय शिक्षणात अमूलाग्र बदल करण्यासाठी १९६४ मध्ये कोठारी आयोग आणला आणि यांनी शिफारस केली की, भारतात एक ैक्षणिक धोरण असले पाहिजे म्हणून या शिफारसीवरून १९६८ मध्ये शिक्षणाचे पहिले रा ट्रीय धोरण आणले. पुढे १९८६ ला राजीव गांधीनी शिक्षणाचे दुसरे रा ट्रय धोरण आणले.*

*१९८६ च्या दुस–या रा ट्रीय ैक्षणिक धोरणाच्या शिफारशी नूसार काळानूरूप बदल करणे आवश्यक होते. त्यामहे त्यात सुधारणासाठी १९९२ मध्ये सुधारणाकरण्यात आल्या. पुढे ३४ व ार्नंतर शिक्षणाचे तिसरे ैक्षणिक धोरण २०२० मध्ये आणले गेले. याता मंजूरी जूलै २०२० मध्ये मिळाली. याचा उद्देश भारताला जागतिक स्तरावर ज्ञानाच्या बाबतीत सुपरपावर बनविणे. पूर्वी शिक्षणाचा आराखडा १० +२+३ होते. आताच्या ैक्षणिक धोरणाचा आराखडा ५+३+३+४ असा आहे.*

| | | |
|---|---|---|
| *यात* | Foundational Stage *(पाया मजबूत करणे)* | *अंगणवाडी पहिली+ दुसरी* |
| | Preparatory Stage | *तिसरी, चौथी, पाचवी* |
| | Middle Stage *(मध्यम स्तर)* | *सहावी ते आठवी* |
| | Secondary stage *(माध्यमिक स्तर)* | *नववी ते बारावी* |

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

*या धोरणात मातृभा  ा प्राधान्य दिले आहे. तसेच कौशल्य विकासावर भर* Multidisciplinary study *ला प्राधान्य, १०वी, १२वी च्या बोर्डाच्या परिक्षेचे महत्व कमी करण्यात आले आहे.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८:**

भारतीय शिक्षण आयोगाच्या  शिफारशींवरून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निश्चित करण्यात आले, हे  या आधी सांगितलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १९६८ साली एक श्वेतपत्रिका प्रसिध्द केली. या पत्रिकेत पुढील १५ ते २० वर्षांच्या कालावधीसाठी राज्याच्या शैक्षणिक पुनर्रचनेचा आराखडा देण्यात आला. या आराखड्यावर राज्यभर चर्चा घडवून आणण्यात आली. त्यानंतर १९७० साली शासनाने महाराष्ट्रातील शिक्षणाच्या पुनर्ररचनेसाठी धोरणविषयक निवेदन प्रसिध्द केले. या निवेदनात प्रामुख्याने तीन उद्दिष्टांवर भर देण्यात आला होता.

१.शिक्षण ही विद्याविषयक उच्च साधना आहे. या साधनेमुळे मानवाला सत्याचा शोध व सर्वोच्च जीवन विकास यांच्या सिध्दीसाठी सातत्याने प्रयत्न करण्याची स्फूर्ती मिळते.

२.व्यक्तींमधील अंतस्थ शक्तीचे प्रकटन व विकास होण्यास शिक्षण मदत करते. अत्युत्तम आविष्कारामुळेच शरीर, बुध्दी, भावना, व्यावसायिक कौशल्ये, कलात्मक संवेदना व जीवनमूल्यांसंबधीची सुयोग्य जाणीव व बाबींचा कमाल मर्यादेपर्यंत विकास व्हायला मदत होते.

३.लोकांचे जीवन, गरजा व आंकांक्षा यांच्याशी शिक्षणाचा योग्य समन्वय साधला जातो. राष्ट्रीय आकांक्षांशी सुसंगत असा राष्ट्रीय विकास घडतो. राष्ट्र समर्थ बनते.

वरील स्थूल उद्दिष्टांवर आधारित पुढीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१.प्रचलित शिक्षण पध्दतीत परिवर्तन करून शिक्षणाचा संबध जनतेने आपले जीवन, दर्जा व आकांक्षा यांच्याशी स्थापन करणे.

२.शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे व सुधारणे.

३.विविध क्षेत्रांतील गुणवत्तेचा शोध घेणे व विकास करणे.

४.शिक्षणाची समान संधी अधिक प्रमाणात निर्माण करण्याच्या दृष्टीने सर्व स्तरांवर व सर्व शाखांतील सुविधांमध्ये वाढ करणे.

वरील उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी अनेक उपक्रमांची आखणी करण्यात आली. मोफत शिक्षण,

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

शिष्यवृत्या, पुस्तक पेढी, फी सवलत, शासकीय विद्यानिकेतने, आदिवासी विद्यार्थ्याकिरिता विद्यानिकेतने यांसारख्या योजना हाती घेण्यात आल्या.

विद्यार्थ्याच्या संख्येच्या प्रमाणात शाळा उघडणे, शाळांना तुकड्या वाढवून देणे, अध्यापकांकरिता निवृत्ती वेतन, अंशदायी भविष्य निर्वाह निधी, अंध ,अपंग व्यक्तींना विशेष वाहनभत्ता, कर्करोग, क्षयरोग, हृदयरोग याबाबत खास सवलती, सेवाशर्ती, अधिनियत, शाळा इमारत बांधकामासाठी अनुदान, चांगले निकाल देणा—या शाळांना प्रोस्ताहनपर अनुदान अशा योजना कार्यान्वित करण्यात आल्या.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६:**

भारतीय संविधानातील तरतुदीनुसार राष्ट्री शिक्षण प्रणाली, कोठारी शिक्षण आयोगातील शिक्षण व राष्ट्रविकासाची संकल्पना आणि १९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांच्या अनुषंगाने १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची संरचना करण्यात आलेली आहे. १९६८ च्या शैक्षणिक धोरणातील उणिवांची दखल १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविताना घेण्यात आली. या धोरणानुसार सर्वांसाठी शिक्षणाचा एक समान आकृतिबंध पुन्हा एकदा सुचविण्यात आला. १०+ २+ ३ ही संरचना मांडण्यात आली.

१० वर्षाचे शालेय शिक्षण : शालेय शिक्षण हे सर्वसाधारण १० वर्षाचे असावे याबद्दल बहुमत असल्याचे आतापर्यंतच्या चर्चेवरून स्पष्ट होते. शालेय शिक्षणाच्या पहिल्या १० वर्षात सर्व मुलामुलींना सर्वसामान्य शिक्षण दिले गले पाहिजे. या स्तरावर अभ्यासक्रमात तीन भाषा, गणित, भौतिकशास्त्र, जीवनशास्त्र, रसायनशास्त्र, आरोग्य, शारीरिक शिक्षण, समाजपयोगी उत्पादक कार्य व समाजसेवा या विषयांचा अंतर्भाव असावा. या शिक्षणामुळे भावी जीवनातील विशेष अभ्यासाचा भरभक्कम पाया तयार व्हावा अशीच अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांना आपला कल आणि आवड कळायला त्यामुळे मदत होईल. त्यांना त्यांच्या क्षमता काय आहेत हे कळू शकेल. शालान्त परीक्षेच्या अखेरीस (१० +) विद्यार्थ्यांना आपला कल निश्चित करणे शक्य होईल असे गृहीत धरण्यात आले आहे. १० वर्षांच्या सर्वसामान्य शिक्षणानंतर ३०% विद्यार्थी व्यवसाय शिक्षणात जावेत असा कयास आहे.

+ २ स्तर : १० वर्षांच्या माध्यमिक शिक्षणानंतर २वर्षे उच्च माध्यमिक शिक्षण देण्यात यावे. अकरावी व बारावी या इयत्तांमध्ये खास किंवा बहुमुखी अभ्यासक्रमांची सोय करावी. विद्यार्थ्यांच्या कलाप्रमाणे आणि क्षमतेनुसार सर्वसामान्य शिक्षण आणि व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांची सोय करण्यात येईल, त्यामुळे उच्च माध्यमिक स्तर ख—या अर्थाने व्यवसायात

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

प्रवेश करण्यासाठीचा अंतिम टप्पा ठरवा असे मानण्यात आले आहे.

कला, हस्तकला, वाणिज्य, कृषी, बागकाम, शास्त्र, तंत्रविज्ञान, औषधालय, औषधे इत्यादी अनेक व्यवसायांशी विद्यार्थ्यांचा परिचय + २ या स्तरावर होईल. विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक क्षमतांचा विकास होऊन निष्णात तंत्रज्ञ व व्यावसायिक तयार होऊ शकतील. असे घडले तर विद्यापीठात प्रवेशासाठी होणा—या अनावश्यक गर्दीला आपोआपच आळा बसेल. मुख्य म्हणजे राष्ट्र उभारणीसाठी लागणारे तंत्रज्ञ आणि मनुष्य बळ उपलब्ध होऊ शकेल.

माध्यमिक शिक्षण देणा—या शाळा या शिक्षणात व्यावसायिक क्रांती घडवून आणणारे अत्यंत प्रभावी साधन ठरणार आहेत. माध्यमिक शिक्षण पूर्ण करून बाहेर पडणारा विद्यार्थी मूलभूत ज्ञान आणि उपयोजित कौशल्य प्राप्त करूनच बाहेर पडणार आहे असा ठाम विश्वास व्यक्त करण्यात आला.

+ ३ स्तर : जे विद्यार्थी कोणत्याही व्यवसायात किंवा उद्योगात प्रवेश मिळवू शकले नाहीत तेच विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षणाकडे वळतील. तीन वर्षांचा पदवीपूर्व अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी संपादन करतील. महाविद्यालयीन शिक्षण किंवा विद्यापीठीय शिक्षण फक्त हुशार व निवडक विद्यार्थ्यांनाच मिळू शकेल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० वैशिष्टे:**

- ✓ आराखडा — ५ + ३+ ३+ ४
- ✓ संशोधनासाठी चालना
- ✓ NTP National tuataras program (शिक्षकासाठी चा कार्यक्रम)
- ✓ (Equal) या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणासाठी सर्वांना समानसंधी मिळवून देणे.
- ✓ (Integrated Curriculum) म्हणजे Interdisplnary and Holistic असा अभ्यासक्रम असेल.
- ✓ लवचिक अभ्यासक्रम : प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा निवडचे (Choice) स्वातंत्र्य असेल.
- ✓ मागास प्रदेशात SEZ (Special educational zone) ची स्थापना करण्यात येईल.
- ✓ मागास प्रदेशात विद्यार्थी व शिक्षक यांचा रेषो २५ : १ असणार व अन्यभागात ३० : १ असेल.
- ✓ सध्या देशात ८०० युनिवसिटी आणि त्यास सलग्न असणारी ४० हजारपेक्षा जास्त कॉलेज आहेत. या नव्या धोरणात विद्यापीठ आणि तिला संलग्न अशी कॉलेज ही संकल्पना

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

काढून टाकून आता कॉलेज आणि विद्यापीठ हे सगळे एकत्र आणून देशात ५ हजार मोठया संस्था (Institute) काढल्या जाणार, त्या ऑटोनॉमस असतील. म्हणजे त्यांना स्वायत्ता दिली जाणार. शिक्षणासाठी फन्डींग उभे करणे म्हणजे खाजगी फन्डींगला चालना आणि ज्या शिक्षण संस्थाना अशा प्रकारे स्वायत्ता दिली जाईल, ते आपले स्वत:चे कोर्स तयार करू शकतील, स्वत:च्या संस्थेमधून डिगरी देऊ शकतील अशा प्रकारचे संस्था (Institute) म्हणण्यापेक्षा १५ हजार विद्यापीठेच निर्माण होतील.

अशा प्रकारच्या युनिवसिटीचे तीन प्रकार असतील




- ✓ उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि देखरेखीसाठी (National Higher Education Qualification Framework) असेल.
- ✓ शिक्षणात नुसतेच पुस्तकी ज्ञान न्हवे तर कौशल्याचे प्रशिक्षण देण्यासाठी (National Skills Education Qualification Framework) असणार.
- ✓ Inter University Center ची स्थापना केली जाणार. परदेशी विद्यापीठे आणि भारतातील विद्यापीठ मिळून Collaboration साठी Inter University Center ची स्थापना केली जाईल.
- ✓ UGC (University Grand Commission) च्या जागी आता उच्च शिक्षणाच्या मुल्य मापणासाठी (Higher Education Grand Councils) ची स्थापना केली जाईल
- ✓ देश पातळीवर संपूर्ण शिक्षणावर देखरेख ठेवण्यासाठी New General Education Council ची स्थापना करण्यात येईल. राज्य पातळीवर त्यांना असे समकक्ष स्थापन करावयाचे असेल तर करू शकतात. तशी राज्यांना परवाणगी असणार.

**२०३० पर्यंत १०० % Gross Enrolment Ratio चे लक्ष :**

- ➢ प्राथमिक ते माध्यमिक शिक्षणाचे एकीकरण
- ➢ मूक्त शालेय शिक्षण पध्दतीव्दारे (Open schollinng ) २ करोड शाळाबाह्य विद्यार्थांना शिक्षण व्यवस्थेत परत आणणे.
- ➢ पाचवी पर्यंत मातृभाषेत शिक्षणाला प्राधान्य असेल. म्हणजेच इयत्ता पाचवीपर्यंत मातृभाषेतच

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

शिक्षण दिले जाणार. युरोपमध्ये ही पध्दती असून मातृभाषेतील शिक्षणामूळे खूप चांगले परिणाम दिसून आले आहेत.

- सहावी पासून कौशल्य विकास शिक्षणाचा भाग असेल. इतर विषयांबरोबर कौशल्य विकसासाठीचे विषय विद्यार्थी घेवू शकतात. तसेच या विषयांवर आधारित आंतरवासिता (Intership) ते करू शकतील. ही संकल्पना चीनमधील Learn coding शी संबधित आहे.
- नववी ते बारावी Multidisciplinary study विद्यार्थी त्याच्या आवडीनूसार विषय निवडू शकतात उदा. इतिहास, विज्ञान या बरोबर संगीत हा विषय निवडणे.
- १० वी १२ वी च्या बोर्डाच्या परिक्षा : या परिक्षाचे महत्व कमी करण्यात आले आहे. २ सेमिस्टर मध्ये या परीक्षा घेतल्या जातील (वर्षातून दोनदा ) पाठांतर करून उत्तरे लिहण्यापेक्षा दैनंदिन उपयुक्त ज्ञानावर आधारित परीक्षा असेल. विज्ञान व कला अशा वेगळ्या शाखातील विषय एकत्र घेऊन शिकता येतील. त्यामुळे आंतरशाखीय शिक्षण सुरू होईल.
- मुल्यमापण : या धोरणानूसार प्रगतीपुस्तकात फक्त गुण व शिक्षकांचे शेरे न देता स्वत: विद्यार्थी, सहविद्यार्थी आणि शिक्षक यांनी मूल्यमापन करावयाचे आहे. या आधारे विद्यार्थ्यांचा जीवन कौशल्य विकास कसा करता येईल हे ठरवता येईल. तसेच वय वर्षे ३ ते १८ म्हणजेच पूर्व प्राथमिक ते १२वी पर्यंतच्या १५ वर्षाचे एकत्र प्रगतीपुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याला मिळेल.
- २०२५ पर्यंत विद्यार्थ्यामध्ये शालेय स्तरावर किमान वाचन व गणित कौशल्य विकसित करणे.
- एम. फिल रद्द: एम. फिल एवजी पीएच. डी. करता येईल.
- उच्च शिक्षणात लवचिकता : महाविद्यालये तसेच विद्यापीठांमध्ये ही आंतर शाखीय विषय एकत्र शिकता येतील. उदा. अभियांत्रिकी व संगीत एकत्र शिकता येईल. यामधून फक्त विद्यी आणि वैद्यकीय शाखा वगळण्यात आल्या आहेत.

**Academic bank of credit:**

कुठलाही टप्यावर शिक्षणस थांबता येईल. त्या शिक्षणाचे गुणांक राखून ठेवले जातील काही कालाने त्या आधारे पदवी ही मिळेल. समजा तुम्ही कोर्सचे पहिले वर्ष पुर्ण केले व काही कारणास्तव तुम्हाला पुढचे शिक्षण पुर्ण करता येत नाही त्यामुळे सोडून दिले नंतर घरची जबाबदारी पार पाडून पुन्हा शिक्षण पुर्ण करावेसे वाटले तर तुम्ही मागील एक वर्ष पुर्ण केलेल्या

क्रेडीटवर त्यापुढचे शिक्षण पुर्ण करता येईल. तुम्ही वेगवेगळ्या अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमात प्राविण्य मिळवले तर ते सुध्दा तुमच्या नावे बॅकेत क्रेडीट स्वरूपात जमा होईल आणि तुम्हास कोर्स पुर्ण करण्यासाठी त्याचा फायदा होईल.

**बी. एड कोर्स** :

बी. एड कोर्स चार वर्षांचा असेल. शिक्षकांच्या जडणघडणीसाठी बी. एड कोर्स अवश्यक असेल. बी. एड कोर्स चार वर्षांचा असेल पण, आगोदर जर तुम्ही पदवी पुर्ण केली असेल तर पदवी नंतर दोन वर्षांचा कोर्स असेल. बी. एड. हा मास्टर लेवलचा कोर्स असेल.

एकच अभ्यासक्रम नियामक मंडळ Highr education commission of India (HECL) सध्या उच्च शिक्षणातील विविध अभ्यासक्रमांसाठी वेगवेगळ्या नियामक संस्था कार्यरत आहेत. त्याएवजी विधी आणि वैद्यकीय शाखा वगळता एकच नियामक मंडळ असेल. Highr education commission of India (HECL) या नियामक मंडळात चार भाग असतील

1. National Higher Education & Regulatory Council (NHERC) –Regulation साठी
2. General Education Council (GEC) – Standard setting साठी
3. Higher Education Grants Council (HEGC) – Funding साठी
4. National Accreditation Council (NAAC) – Accreditation साठी

**National Research Foundation :**

अमेरिके प्रमाणे भारततही संशोधनाला महत्व देणे व त्याचा दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय संशोधक संस्था स्थापन केली जाईल. केवळ विज्ञानच नव्हे तर समाजशास्त्रातील संशोधनाला ही वित्तीय मदत केली जाईल. देशातील उच्च शिक्षणचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला जाईल. Multidisciplinary Education and Research Universities (MERUs) - IITs, IIMs सारख्या जागतिक स्तरावरील संस्था (Institute) उभ्या केल्या जातील. पाच वर्षा ऐवजी ४ वर्षांनी Ph. D ची मुभा मिळणार. तीन वर्षाच्या पदवीनंतर एक वर्षाचे पदवित्तर शिक्षण घेता येईल. उदा. बी. एसी. बाय रिर्सच

**शिक्षकांसाठी :**

NCERT व NCTC याच्याव्दारे National Curriculum Framework for Teacher Education (NCFTE) 2021 स्थापन करण्यात येईल. National Assessment Center- PARAKA Performance Assessment Review and analysis of knowlge for Holistic Development

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

**शुल्क निश्चती :**

खाजगी व सरकारी शैक्षणिक संस्थाच्या शुल्क आकारणीसाठी समान शर्ती निश्चित केल्या जाणार आहेत. २०३० प्रत्येक जिल्हात एक बहुविध आंतरशास्त्रीय महाविद्यालय सुरू केले नाईल. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०नूसार GDP च्या ६% खर्च शिक्षणावर करणेत येईल. सध्या तो ४.६ % इतका आहे.

**तंत्रज्ञानाचा वापर :**

स्थानिक भाषा E Content चा वापर, Virtual labs अभासी लॅब स्थापना करणार, New National Education Technology Foram ची स्थापना करणार — कल्पनांचे आदान—प्रदान करण्यासाठी शिक्षण व्यवस्थापन यांचे डिजिटलायझेशन करणार. व्यवसायिक शिक्षण Intigrated केले जाणार.

**सर्व भारतीय भाषांना प्राधान्य :**

भारताच्या सर्व भाषांना चालना देणारे विशेष धोरण आखले आहे. या नवीन शिक्षण धोरणानूसार मराठी तसेच भारतातील सर्व भाषांचे संगोपन व्हावे, विकास व्हावा असे धोरण आखले गेले आहे. संस्कृत सहीत अभिजात भाषा (Classial) आता संध्या देशात १२ते १३ भाषा अभिजात भाषा आहेत. उदा. पाली, पर्शियन, उडिया ई. मराठीला सुध्दा अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्न सुरू आहेत. आपल्या भारतात राज्यघटनेत २३ भाषा राष्ट्रीयकृत भाषा आहेत. या सर्व भाषेमध्ये उत्तम साहित्य तयार होते. या धोरणानुसार या उत्तम साहित्याचे वेगवेगळ्या भाषेत भाषांतर झाले पाहिजे अशी संकल्पना आहे. ही संकल्पना साने गुरूजी यांनी मांडली होती. त्यास आंतरभारतीय असे नाव दिले गेले होते. उदा. छावा, मुत्युंजय जगातील विविध भाषा आपल्या भारतात आल्या पाहिजेत म्हणून विदेशी विद्यालये भारतात त्यांचे कॅम्पस घेवून येतील. उदा. पाली, पार्शियन व प्राकृत इत्यादी करीत राष्ट्रीय संस्था, भाषांतर व अन्वयार्थकरीता संस्था (Indian Institute of translation and interpretation) ची स्थापना होणार.

**त्रिभाषा सूत्र :**

या धोरणानूसार तीसरी भाषा निवडण्यास मुभा

१. इंग्रजी जगाची

२. त्या त्या प्रदेशाची भाषा

३. कोणतीही भाषा निवडण्यास मुभा

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

**प्रौढ शिक्षण :**

प्रौढ शिक्षणाचे वय वर्षे १६ च्या पुढे असेल. ३ ते १८वर्षांपर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण आहे. मुलांची गळती होऊ नये म्हणून पटसंख्येचा रेषो १००% राखण्यात येईल. लिटरसी व न्यूमरसी Skill किमान प्रत्येकाकडे असावे अशी तरतूद केली आहे. हा मुद्दा नविन नाही, शिक्षण धोरणात राजीव गांधीच्या काळातही हा मुद्दा होता. प्रौढासांठी National Curriculum Framework तयार करणारण्यात येईल.

बारावी पर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण. बारावी नंतर त्याच्या निवडीनूसार कोणत्याही कोर्स जाऊ शकतो. बारावी नंतर एक वर्ष पुर्ण केल्यास सर्टीफीकेट मिळणार, दोन वर्ष पुर्ण केल्यास डिप्लोमा सर्टीफीकेट मिळणार, तीन वर्ष पुर्ण केल्यास डिगरी सर्टीफीकेट मिळणार. (अपवादात्मक काही कोर्स तीन एवजी चार वर्षाचा असू शकतो.)

**१९८६ आणि २०२० राष्ट्रीय शैक्षणिक धोरण:**

| **१९८६ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण** | **२०२० राष्ट्रीय शैक्षणिक धोरण** | **नविन बदलामुळे होणारे परिणाम** |
|---|---|---|
| डॉ. कोठारी व डॉ. राममूर्ती या शिक्षण तज्ञांच्या शिफारशीवर आधारीत धोरण | के. कस्तुरीरंजन प्रथमच एक शास्त्रज्ञ आयोगाच्या अध्यक्षपदी होते. त्यांच्या समवेत शिक्षकांचा इतर तज्ञांचा समावेश | माहिती तंत्रज्ञान विकास व कौशल्य आणि संशोधनास चालना देणा—या शिफारशीचा समावेश झालेला दिसून येतो |
| आकृती बंध<br>१० + २+ ३ | ५ +३ + ३+ ४ | पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण एकीकृत शिक्षणाचा भाग असेल |
| पूर्व प्राथमिक शिक्षण अंगणवाडयांमधून | पूर्व प्राथमिक शिक्षण हा प्राथमिक शिक्षणाचा एक भाग | अंगणवाड्या प्राथमिक शाळांना जोडल्या जातील |
| वय वर्ष ६ पूर्ण झाल्यानंतर प्राथमिक शाळेत प्रवेश | वय वर्ष ३ पूर्ण झाल्यानंतर प्राथमिक शाळेत प्रवेश | पूर्व प्राथमिक शिक्षण व प्राथमिक शिक्षण एकाच छताखाली एकाच व्यवस्थापनाकडून मिळेल. |
| त्रिभाषा सुत्राचा अवलंब | इ. ५वी पर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून | विद्यार्थ्यावरील बौध्दिक ताण कमी होऊन संबोध संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल. शिक्षण अधिक आनंददायी होईल. |
| माध्यमिक शिक्षण ९वी ते १०वी व उच्च माध्यमिक शिक्षण ११वी ते १२वी | माध्यमिक शिक्षण ९वी ते १२वी | इ. ९वी मध्येच प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी आपल्या आवडीनूसार शाखा निवड करणार |

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I

NOV – DEC 2022

Original Research Article

| | | |
|---|---|---|
| प्राथमिक शिक्षण पात्रतेसाठी दोन वर्षाचा डी.एड. चा व माध्यमिक शिक्षकांसाठी बी.एड चा अभ्यासक्रम | शिक्षक पात्रतेसाठी एकीकृत चार वर्षाचा अभ्यासक्रम (इंटीग्रेटेड बी.एड) | प्रात्यक्षिक व प्रत्यक्ष अध्यापनाच्या अनुभवाचा समावेश असल्यामुळे कुशल व प्रशिक्षित शिक्षक मिळणार |
| दहावी व बारावी गुणपत्रकांत गुणांना महत्व | दहावी व बारवी गुणपत्रकांत कौशल्य व क्षमता विभागाचा समावेश | केवळ बौध्दिक विकास न होता सर्वांगीण विकासास चालना मिळेल. |
| एका वेळी एकाच शाखेचा अभ्यासक्रम घेता येतो. | एकाचवेळी विविध शाखांमधील विषयांचा अभ्यास करून पदवी करता येणार | साचेबंदपणा दूर होऊन विद्यार्थ्यांना क्षमता व आवडीनूसार शिक्षण मिळणार |
| कला, क्रिडा, संगीत, योग, समाजसेवा यांचा एक्स्ट्रा करिकुलम म्हणून समावेश | कला, क्रिडा, संगीत, योग व समाजसेवा अभ्यासक्रमाचा भाग असणार | विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल व शिक्षणाबरोबर कौशल्य विकास ही घडून येईल |
| केवळ शिक्षकांमार्फत मूल्यांकन | विद्यार्थी स्वत: सहादायी व शिक्षक मूल्यांकन करणार | सर्वांगीण व व्यापक मूल्यांकनास चालना मिळेल. |

**Cite This Article:**

**डॉ. लता शिवाजी पाटील आणि **श्रीमती संगीता बाबासो माने (2022).* राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, ***Educreator Research Journal, Volume–IX, Special Issue – I**, Nov –Dec 2022, 132-141.*